MHYA120006312016

दाखल केल्याची तारीख : ०७/११/२०१६
नोंदणी केल्याची तारीख : ०७/११/२०१६
घोषित केल्याची तारीख : २७/१०/२०२३
कालावधी : वर्षे म. दि.
०६ ११ २०

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, महागांव जि. यवतमाळ यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी श्री. एस. एम. कोळेकर)**

**नियमीत दिवाणी दावा क्र.३२/२०१६** **निशाणी क्र.४७/अ**

वादी : १) **कु. पुजा सुभाष महाजन,**
वय. अज्ञान, धंदा– शिक्षण,
करीता अ.पा.क.आई वादी क्र. २
नंदा सुभाष महाजन,
२) **श्रीमती नंदा सुभाष महाजन,**
वय– ४० वर्ष, धंदा– शेती,
रा. करंजी, ता. महागांव, जि. यवतमाळ,
३) **सौ. अलका सतिष गव्हाणे,**
वय– २० वर्ष, धंदा– घरकाम,
रा. निवघा, ता. हदगांव, जि. नांदेड

::**विरुध्द::**

प्रतिवादी : १) **श्रीमती लहानुबाई नारायण महाजन,**
वय– ६५ वर्ष, धंदा– काही नाही.
२) **गणेश नारायण महाजन,**
वय– ३५ वर्ष, धंदा– शेती,
रा. करंजी, ता. महागांव, जि. यवतमाळ,

**दावा –** सरस निरस मानाने वाटणी होवून मिळण्याबाबत. तसेच बक्षिसपत्र वादींवर बंधनकारक नाही असे घोषीत होवून मिळणेबाबत तसेच कायमचा मनाई हुकुम मिळणेबाबत.

==============================================

**श्री. एस. पी. देशमुख, वकील वादींतर्फे.**
**श्री. ए. बी. गोडसे, वकील प्रतिवादी क्र. १ तर्फे.**
**श्री. के. आर. वानखेडे, वकील प्रतिवादी क्र. २ तर्फे.**

==============================================

## :: न्यायनिर्णय ::

(घोषित दिनांकः– २७ ऑक्टोबर, २०२३)

प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादीं विरुध्द मौजे दहिवड, ता. महागांव जि. यवतमाळ येथील गट क्र.८४ मधील २ हे. ०४ आर जमीनीची निरस मानाने वाटणी होवून मिळण्याबाबत. बक्षिसपत्र वादींवर बंधनकारक नाही असे घोषीत होवून मिळणेबाबत तसेच कायमचा मनाई हुकुम मिळणेबाबत दाखल केला आहे.

**वादीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे आहे,**

२. वादी ज्या मालमत्तेबाबत हा दावा दाखल करित आहेत त्या मालमत्तेचे वर्णन खालील प्रमाणे आहे–

(अ) मौजे दहिवड, ता. महागांव जि. यवतमाळ येथील शेत सर्व्हे नंबर ८४, क्षेत्रफळ २ हे. ०४ आर. जिच्या चतुः सिमा **पुर्वेस–**पंजाब राठोड यांची शेतजमिन, **पश्चिमेस–**शामराव धुळे यांची जमिन, **उत्तरेस–** शंकर लालसिंग चव्हाण यांची जमिन व **दक्षिणेस–**रमेश मंगू पवार यांची जमिन. यापुढे या मालमत्तेस "वाद

मालमत्ता" अथवा "दाव्यातील मालमत्ता" अथवा "वाद शेतजमिन" किंवा ''दावा मिळकत'' असे संबोधण्यात येईल.

३. प्रतीवादी क्र. १ हिला दोन मुले नामे सुभाष नारायण महाजन म्हणजेच वादी क्र.१ व ३ चे मयत पिता व वादी क्र.२ यांचे मयत पती व गणेश नारायण महाजन म्हणजेच प्रतिवादी क्र.२ अशी दोन मुले होती. प्रतिवादी क्र.१ ही वादी क्र. १ व ३ ची आजी असून वादी क्र.२ ची सासू आहे आणि प्रतिवादी क्र.२ हा वादी क्र. १ व ३ या काका असून वादी क्र.२ चा दिर आहे.

४. मयत सुभाष महाजन हा कुटुंबातील मोठा मुलगा असल्यामुळे तो घरातील कर्ता पुरूष होता त्यामुळे तो घरातील सर्व व्यवहार तो पाहत असे. वादी क्र. १ व ३ चे मयत वडील व मयत आजोबा नामे नारायण महाजन हे लोकांच्या शेतजमिनी मक्त्याने व बटईने करीत होते तसेच मयत सुभाष महाजन हा शेळीपालनाचा व्यवसाय करीत होता. अशाप्रकारे वादी क्र.१ व ३ चे वडील व आजोबा यांनी त्यांच्या एकत्र कुटुंबाचे उत्पन्नातून दिनांक ०४/०३/१९९४ रोजी वाद शेतजमिन नोंदणीकृत खरेदीखताने रूपये ३३,०००/– चे मोबदल्यात श्री. नारायण गुणाजी इंगोले यांचेपासून प्रतिवादी क्र.१ हिचे नावाने विकत घेतली होती. वादी क्र.१ व ३ चे मयत आजोबा नामे नारायण महाजन यांना दारूचे व्यसन असल्यामुळे वाद शेतजमिन ही त्यावेळी मयत सुभाष महाजन यांनी प्रतिवादी क्र.१ ही जन्मदाती आई असल्यामुळे तिचे नावाने घेतली होती.

५. वास्तविकत: याद शेतजमिनीचा मोबदला प्रतिवादी क्र.१ ने दिला नव्हता केवळ प्रतिवादी क्र.१ ही आई असल्यामुळे तिच्या नावाने वाद शेतजमिन घेण्यात आलेली आहे. वाद शेतजमिनीचा मोबदला हा केवळ वादी क्र.१ व ३ चे मयत वडिल व आजोबा यांचे एकत्र कुटुंबाचे उत्पन्नातून देण्यात आलेला होता आणि त्यामुळे वाद मालमत्ता ही अशाप्रकारे एकत्र कुटुंबाची मालमत्ता आहे आणि त्यामुळे या वाद शेतजमिनीमध्ये वादींचा कायद्याने समसमान हिस्सा निघतो व आहे. वाद शेतजमिन ही एकत्र कुटुंबाची मिळकत असल्यामुळे वादीचे ताब्यामध्ये १ हे. २१ आर. शेतजमिन आहे. उर्वरीत शेतजमिन ही प्रतिवादी क्र. २ चे ताब्यात आहे. परंतू वादीचे ताब्यात असलेल्या शेतजमिनीबाबत प्रतिवादी क्र.१ ने राजस्व दप्तरात त्यानुसार नोंद करून दिलेली नाही. त्यामुळे वादींनी त्यांचे वकिलामार्फत प्रतिवादींना दिनांक १७/०९/२०१६ रोजी सुचनापत्र पाठवून वाद शेतजमिनीमध्ये वादींचा असणाऱ्या हिश्याची मागणी केली होती परंतू त्यास प्रतिवादींनी खोटे व बनावट असे उत्तर दिले त्यामुळे नाईलाजास्तव वादींना त्यांचा वाद शेतजमिनीमध्ये असणारा हिस्सा मिळणेकरीता वि न्यायालयात सदरहू दावा दाखल करावा लागत आहे.

६. प्रतिवादी क्र. १ हीला कोणताही कायदेशिर अधिकार नसतांना दिनांक ०१/०७/२०१६ रोजी दाव्यातील वाद शेतजमिनीमधील निम्मे शेतजमिनीचे प्रतिवादी क्र.२ यास करून दिलेले बक्षिसपत्र हे अवैध असून ते बक्षिसपत्र हे बेकायदेशिररीत्या करून दिलेले आहे आणि त्यामुळे ते बक्षिसपत्र वादींवर बंधनकारक

नाही असे घोषीत होवून मिळणे गरजेचे आहे. दाव्यातील शेतजमिन ही एकत्र हिंदु कुटुंबाची मालमत्ता असल्यामुळे त्यात वादीचा समसमान हिस्सा आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ व २ हे सदरहू वाद शेतजमिन ईतर कुणासही विक्री करण्याचे विचारात आहे आणि त्यामुळे प्रतिवादींनी वाद शेतजमिन ईतर कुणासही विक्री केल्यास या वादींचे कधीही भरून न निघणारे नुकसान होईल. त्यामुळे दाव्याचा निकाल लागेपावेतो प्रतिवादींनी दाव्यातील मालमत्ता ईतर कुणासही विक्री करू नये किंवा ईतर कुणासही कोणत्याही हस्तांतरणाने हस्तांतरीत करू नये किंवा त्यावर बोजा निर्माण करू नये असा कायमचा मनाई हुकुम मिळण्याची मागणी देखिल वादी या दाव्यात केली आहे. वादी क्र. ३ ही विवाहीत मुलगी असून ती तिचे सासरी राहते परंतू वाद शेतजमिनीमध्ये ती कायदेशिर वारस असल्याने तिचा देखिल ईतर वारसांप्रमाणे समसमान हिस्सा व अधिकार आहे. करीता सदराचा दावा दाखल करुन वादीने त्यांची मागणी मंजुर करावी अशी विनंती केली आहे.

७. प्रतिवादी क्र. १ हिने प्रकरणात हजर होउन तिची लेखी कैफियत नि.१४ वर दाखल केली. तिने तिच्या लेखी जबाबात वादींच्या दाव्यातील नाते संबंधाचा मजकुर वगळता ईतर कथने नाकारुन तिने तिच्या पुरक जवाबात कथन केले की, प्रतिवादी क्र. १ यांना दोन मुले नामे सुभाष आणि गणेश असे होते त्या पैकी आज मोठा मुलगा नामे सुभाष म्हणजेच वादी नंबर १ व ३ चे पिता व वादी नंबर २ चे पती होते व ते मयत आहेत. प्रतिवादी क्र. १ लहानुबाई हिचा विवाह नारायण

महाजन म्हणजेच वादी क्र.१ व ३ चे आजोबा सोबत झाला तेव्हा पासून प्रतिवादी क्र. १ ही रोजमजूरी करित असे तसेच तिने पूढे शेळीपालनाचा देखील व्यवसाय केला होता व अशा प्रकारे तिने फार सुरवाती पासूनच म्हणजेच तिला आपत्य होण्या पूर्वी पासूनच तिने पैसे कमाविणे सुरु केले होते तसेच ती आलेल्या पैशातून काही पैसे शिल्लक देखील टाकीत असे.

८. प्रतिवादी नंबर १ हिने शिल्लक टाकून जमा केलेल्या पैशातून तिने सन १९९४ मध्ये नारायण गुणाजी इंगोले यांची विक्रीला निघालेली शेत जमीन विकत घेण्याचे ठरविले व त्या वेळी तिने तिची ही ईच्छा तिचे मुलांना बोलून दाखविली. त्या नुसार प्रतिवादी क्र.१ हिने जमा केलेल्या पैशातून दिनांक ०४/०३/१९९४ रोजी मोजा दहिवड ता. महागांव जि. यवतमाळ येथील शेत सर्वे नंबर ८४ क्षेत्रफळ २ हेक्टर ४७ आर ही शेतजमीन नारायण गुणाजी इंगोले यांचे पासून रक्कम रु.३३,०००/– चे मोबदल्यात तिचे स्वतःचे नांवाने विकत घेतली होती.

९. शेत जमीनीचा मोबदला हा प्रतिवादी क्र.१ हिने स्वतः दिलेला आहे व या प्रमाणे सदरची शेतजमीन ही प्रतिवादी क्र.१ हिची स्वकष्टार्जीत मिळकत आहे त्यामूळे त्यावर केवळ प्रतिवादी क्र.१ हिचा कायदेशिर अधिकार आहे. वादी नंबर १ व ३ चे वडिल व वादी नंबर २ चे पति सुभाष महाजन हा मयत झाल्या नंतर वादी नंबर २ हिने प्रतिवादी क्र. १ हिस घराचे बाहेर काढले होते व तेव्हा पासून प्रतिवादी क्र. १ ही प्रतिवादी क्र.२ सोबत रहात आहे. प्रतिवादी क्र.२ याने प्रतिवादी क्र.१ ची काळजी

घेतली व तीची सेवासूश्रूषा केली त्यामूळेच प्रतिवादी क्र.१ हिने दिनांक ०१/०७/२०१६ रोजी एकूण शेत जमीनी पैकी १ हेक्टर २१ आर शेतजमीन ही नोदंणीकृत बक्षिसपत्राने प्रतिवादी क्र. २ ला दिलेली आहे. बक्षीसपत्राने शेत जमीन देण्याचा प्रतिवादी क्र.१ हिस पूर्णपणे अधिकार आहे.

१०. वादींचा वाद मालमत्तेत कोणताही हिस्सा अगर वारसा हक्काने हिस्सा निघत नसतांना केवळ प्रतिवादीस त्रास देवून खर्चात टाकण्या करिता या प्रतिवादी विरुध्द हा खोटा दावा दाखल केला असल्यामूळे व खोटी मांडणी केल्यामूळे वादींचा दावा या प्रतिवादींचे खर्चासह खारीज करण्यात यावा. प्रतिवादी क्र. २ ने त्याचे म्हणने दाखल केले नाही म्हणुन त्याच्या विरुध्द विना कैफियत आदेश पारीत करण्यात आला आहे.

११. वादीं व प्रतिवादीं यांचे परस्पर विरोधी कथनावरुन माझे पुर्वाधीकारी यांनी नि.क्र.३५ वर मुद्दे काढले. त्या सर्व मुद्दयांचे निष्कर्ष मी कारणामिमांसेसह खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी हे सिध्द करतात का की, वाद मिळकत वादी व प्रतिवादींच्या हिंदु अविभक्त कुटुंबाची वडीलोपार्जीत मिळकत आहे ? | **.... होकारार्थी** |
| २. | वादी हे सिध्द करतात काय की, त्यांचा वाद मिळकतीमध्ये अविभक्त हिस्सा आहे. ? असल्यास किती ? | **.... होकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| ३. | वादी हे सिध्द करतात का की, प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र.२ चे हक्कात दि.०१/०७/२०१६ रोजी करुन दिलेले बक्षिसपत्र क्र.२४२/२०१६ हे अवैद्य व बेकायदेशीर आहे व त्यामुळे ते वादीवर बंधनकारक नाही ? | .... **होकारार्थी** |
| ४. | वादी त्यांनी मागणी केल्याप्रमाणे प्रतिवादी विरुध्द मनाई हुकूम मिळणेस पात्र आहेत का ? | .... **नकारार्थी** |
| ५. | प्रतिवादी क्र.१ असे सिध्द करते काय की, वाद मिळकत ही तिची स्वकष्टार्जीत मालमत्ता आहे ? | .... **नकारार्थी** |
| ६. | प्रतिवादी क्र.१ असे सिध्द करते काय की, वाद मिळकत ही तिची स्वकष्टार्जीत मालमत्ता असल्यामुळे त्या मिळकतीचे बक्षिसपत्र प्रतिवादी क्र. २ च्या हक्कात करुन देण्याचे अधिकार तिला आहे ? | .... **नकारार्थी** |
| ७. | अंतिम आदेश, खर्च व हुकूमनामा काय ? | ...... **अंतिम आदेशा प्रमाणे.** |

## :: <u>कारणमिमांसा</u> ::

१२. सदर कामी वादीतर्फे साक्षीदार क्र.१ स्वत: वादी क्र.३ सौ. अलका गव्हाणे हिची साक्ष **<u>नि.क्र.३९</u>** वर साक्षीदार क्र.२ वादी क्र.१ पुजा सुभाष महाजन हिची साक्ष **<u>नि.क्र.४०</u>** वर नोंदविली आहे. वादीने **<u>नि.क्र.४१</u>** नुसार पुरसिस दाखल करुन त्याचा पुरावा बंद केला. वादीने कागदोपत्री पुरावा म्हणुन अभिलेखावर खालील कागदपत्रे दाखल केली आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | वादीने प्रतिवादीला पाठविलेले सुचनापत्र | |
| २. | प्रतिवादीला सुचनापत्र मिळाल्याची पोच पावती | **नि.क्र.४२** |

| | | |
|---|---|---|
| ३. | वारसाचे प्रमाणपत्र | **नि.क्र.४३** |
| ४. | शेत सर्वे क्र. ८४ चा सातबारा उताऱ्याची प्रत. | **नि.क्र.४४** |
| ५. | शेत सर्वे क्र. ८४ चा आठ–अ उताऱ्याची प्रत. | **नि.क्र.४५** |
| ६. | फेरफाराची नक्कल | **नि.क्र.४६** |

१३. प्रतिवादीला वेळोवळी संधी देउनही पुरावा दिला नाही. त्यामुळे निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करुन प्रतिवादीचा पुरावा बंद करण्यात आला.

१४. वादींचे विधीज्ञ **श्री. एस. पी. देशमुख** यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख पडताळला.

**मुद्दा क्रमांक १ ते ३, ५ व ६ करीता** –

१५. वादीचे थोडक्यात कथन आहे की, वाद माालमत्ता ही वादींची वडीलोपार्जीत शेत जमीन असुन त्यामध्ये वादींचा हिस्सा आहे. परंतु प्रतिवादींचे कथन आहे की, वाद मालमत्ता ही प्रतिवादी क्र.१ लहानुबाई महाजन हिची स्वकष्टार्जीत मिळकत आहे व तिने नोंदणीकृत बक्षीसपत्र क्र.३४२/२०१६ नुसार ती मालमत्ता प्रतिवादी क्र.२ च्या नावे हस्तांतरीत केलेली आहे. त्या मिळकतीमध्ये वादींना हिस्सा नाही.

१६. वादी व प्रतिवादी यांच्या परस्पर विरोधी कथनावरुन मी

अभिलेखावरील कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वाद मालमत्ता ही पुर्वी प्रतिवादी क्र.१ लहानाबाई हिने नारायण गुणाजी इंगोले यांचे पासुन रक्कम रु.३३,०००/– च्या मोबदल्यात खरेदी घेतेलेली आहे. व त्यानंतर फेरफार क्र. २५४ मंजुर होउन प्रतिवादी क्र.१ लहानाबाई हिचे नावं राजस्व दप्तरी, सातबारा व आठ–अ पत्रकी नोंद झाले आहे.

१७. याकामी वादीने दाव्यातील कथने शाबीत करण्याकरीता वादीतर्फे साक्षीदार क्र. १ अलका गव्हाणे हिचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.३९ वर दाखल केलेले आहे. तसेच वादी तर्फे सा.क्र.२ पुजा महाजन हिचे साक्षी पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.४० वर दाखल केलेले आहे. सदर दोन्ही शपथपत्रामध्ये वादी साक्षीदारांनी त्यांच्या दाव्यातील कथनास पुष्टी मिळेल असे कथन केलेले आहे. सदर दोन्ही साक्षीदाराच्या साक्षी पुराव्यात आले आहे की, वाद मालमत्ता ही त्यांचे मयत वडील सुभाष नारायण महाजन व मयत आजोबा नारायण महाजन हे लोकांच्या शेत जमीनी मक्त्याने व बटईने करीत होते. तसेच मयत सुभाष महाजन हा शेळी पालनाचा व्यवसाय करीत होता. अशा प्रकारे वादी क्र.१ व ३ चे वडील सुभाष व त्यांचे आजोबा नारायण यांनी त्याच्या स्वकष्टार्जीत उत्पन्नातुन दि.०४/०३/१९९४ रोजी वाद शेत जमीन नोंदणीकृत खरेदीखताने रक्कम रु.३३,०००/– च्या मोबदल्यात नारायण गुणाजी इंगोले यांचे पासुन प्रतिवादी क्र.१ हिचे नावाने विकत घेतली होती. खरदीखताचा मोबदला त्यांचे वडील व आजोबा यांनी दिला आहे. त्याचे मयत

आजोबा नारायण महाजन यांना दारुचे व्यसन असल्यामुळे त्यावेळी वाद जमीन ही प्रतिवादी क्र.१ हिच्या नावे घेतली. त्यांच्या सरतपासातील उर्वरीत मजकुर हा दाव्यातील मजकुरा प्रमाणे असल्यामुळे पुनरावृत्ती टाळण्यासाठी येथे नमुद केलेला नाही.

१८. प्रतिवादींनी वादी साक्षीदारांचा उलट तपास घेतलेला नाही. त्यामुळे वादींच्या तोंडी पुराव्यातील कथने अबाधीत राहिलेली आहेत. या कामी प्रतिवादीचे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ हिचा विवाह झाल्या पासुन ती रोज मजुरी करीत असे व पुढे तिने शेळी पालनाचा व्यवसाय केला होता. व तिने फार सुरवाती पासुन पैसे कमविने सुरु केले होते व आलेल्या पैशातुन ती काही पैसे शिल्लक टाकीत असे व त्यानंतर शिल्लक जमा केलेल्या पैशातुन सन १९९४ मध्ये नारायण गुणाजी इंगोले यांचे पासुन वाद मालमत्ता रक्कम रु.३३,०००/–च्या मोबदल्यात खरेदी घेतलेली आहे. ती मिळकत तिची स्वकष्टार्जीत आहे. परंतु त्या बाबत प्रतिवादीने कोणताही पुरावा दिलेला नाही. अथवा तसे वादी साक्षीदारांचा उलट तपास घेउन शाबीत केलेले नाही.

१९. एकंदरीतच अभिलेखावरील पुराव्या वरुन असे दिसते की, वादी साक्षीदारांचा पुरावा प्रतिवादींनी खोडुन काढलेला नाही. त्यामुळे वादींच्या साक्षी पुराव्यावर अविश्वास दाखविण्याचे कोणतेही कारण नाही. वादींच्या साक्षी पुराव्यातुन

वाद मालमत्ता ही वादी क्र. १ व ३ चे वडील व वादी क्र. २ चे पती सुभाष महाजन व वादी क्र.१ व ३ चे आजोबा नारायण महाजन यांनी लोकांच्या शेत जमीनी मक्याने व बटईने करुन, तसेच मयत सुभाष महाजन यांचा शेळी पालनाचा व्यवसाय होता व त्यांनी त्यामधुन मिळालेल्या उत्पानातुन वाद मालमत्ता प्रतिवादी क्र.१ लहानुबाई महाजन हिच्या नावाने खरेदी केली आहे. तसेच त्या मिळकतीचे अद्याप पावेतो वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये सरस निरस मानाने वाटप झाले आहे असे काही वादी प्रतिवादीचे कथन नाही. त्यामुळे वाद मालमत्ता ही वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जीत अविभक्त एकत्र कुटुंबाची मिळकत असल्याचे शाबीत झालेले आहे. त्या मिळकतीमध्ये वादींचा हिस्सा आहे. ती मिळकत प्रतिवादी क्र.१ ची स्वकष्टार्जीत मिळकत आहे हे उपलब्ध पुराव्या वरुन शाबीत झालेले नाही व तसा पुरावा प्रतिवादीने दिलेला नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ च्या नावाने दि.०७/०२/२०१६ रोजी करुन दिलेले बक्षीसपत्र क्र.३४२/२०१६ हे वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाही. परंतु सदर बक्षीसपत्राने प्रतिवादी क्र.१ ने तिचा हिस्सा प्रतिवादी क्र.२ च्या हक्कात सोडुन दिलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ व २ च्या हिश्या पुरते ते बक्षीसपत्र वैद्य ठरते. प्रचलीत कायद्यातील तरतुदी नुसार वाद मालमत्तेमध्ये वादी क्र.१ व ३ यांचे वडील व वादी क्र.२ चे पती सुभाष यांना वाद मालमत्तेत १/३ हिस्सा प्राप्त होईल, तसेच प्रतिवादी क्र.२ व ३ यांना प्रत्येकी १/३ हिस्सा प्राप्त होईल. परंतु प्रतिवादी क्र.१ ने वाद मालमत्तेमधील तिचा हिस्सा प्रतिवादी क्र.२ च्या हक्कात वर नमुद बक्षीसपत्राने सोडुन दिला आहे. त्यामुळे वाद

मालमत्तेत प्रतिवादी क्र.२ याला २/३ हिस्सा प्राप्त होईल. मयत सुभाष याचा १/३ हिस्सा मध्ये वादी क्र.१ ते ३ याना प्रत्येकी १/९ हिस्सा प्राप्त होईल. म्हणुन मी मुद्दा क्र. १, २ आणि ३ चा निष्कर्ष होकारार्थी देतो व मुदा क्र. ५ व ६ चा निष्कर्ष नकारार्थी देतो.

**मुद्दा क्र. ४ करीताः–**

२०. प्रतिवादींनी वाद जमीन कोणालाही विक्री करु नये अथवा हस्तांतरीत करु नये असा कायम मनाई हुकूम होउन मिळण्याची मागणी वादींनी केली आहे. परंतु प्रतिवादी हे वाद शेत जमीन ईतर कोणास विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत याबाबत कोणताही ठोस असा पुरावा वादींनी अभीलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे वादी हे प्रतिवादी विरुध्द निरंतरचा मनाई आदेश होउन मिळण्यास पात्र नाही. म्हणुन मी मुद्दा क्र.४ चा निष्कर्ष नकारार्थी देतो.

**मुद्दा क्र.७ करीताः–**

२१. अभिलेखावर एकंदरीत पुरावा व मुद्दा क्र.१ ते ६ करीता मी दिलेली कारणमिमांसा यावरुन वादींचा दावा खर्चासह अंशतः मंजुर करणे योग्य होणारे आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. ७ करीता पुढिल प्रमाणे आदेश पारीत करतो–

# :: <u>आदेश</u> ::

१. वादींचा दावा खर्चासह अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. वाद मालमत्तेमध्ये वादी क्र.१ ते ३ चा प्रत्येकी १/९ हिस्सा आहे असे जाहिर करण्यात येते तसेच प्रतिवादी क्र.२ याचा २/३ हिस्सा असल्याचे जाहिर करण्यात येत आहे.

३. वर आदेशीत केल्या प्रमाणे वाद मालमत्ते मधील वादींचे हिस्से सरस निरस मानाने वाटप होउन त्यांचा स्वतंत्र कब्जा मिळण्या करीता दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम ५४ प्रमाणे मा.जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना प्रिसेप्ट/पत्र पाठविण्यात यावे.

४. आदेशा प्रमाणे प्राथमीक हुकूमनामा तयार करण्यात यावा.

**( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)**

**(एस. एम. कोळेकर)**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
महागांव, जि. यवतमाळ.

दिनांक: २७/१०/२०२३

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

Sd/-
[A.P.Gudhatwar]
Stenographer Grade-3